सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

ज्ञानगंगा घरोघरी

Ph. :0253-2231714,15 http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

जा.क्र. वि.से.वि-नोंदणी/2021/ 242 दि. 01.10.2021

## सुचना पत्र क्र. 18

**नैसर्गिक आपत्तीमुळे बी.एड.प्रवेश पडताळणी**
**न झालेल्या प्रवेशार्थींना एक संधी देणेबाबत**

विद्यापीठाच्या सर्व विभागीय केंद्रांवर त्यांच्या अंतर्गत असलेल्या जिल्ह्यातील बी.एड्. (2021-23) प्रवेशार्थींचे कागदपत्र पडताळणीसाठी दि. 28 सप्टेंबर 2021 ते दि. 5 ऑक्टोबर 2021 या कालावधीत आयोजन केलेले होते. विद्यार्थ्यांनी जिल्हानिहाय वेळापत्रकानुसार त्यासाठी उपस्थित राहून मुळ कागदपत्रांची पडताळणी करून घेणेबाबत सूचना पत्र क्र. 16 नुसार दि. 23.09.2021 रोजी कळविण्यात आलेले होते.

परंतू संपुर्ण महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस, अतिवृष्टीमुळे रस्ते/वाहतूक बंद झालेली होती. त्यामुळे काही विद्यार्थ्यांना विभागीय केंद्रावर पोहोचता आलेले नाही व त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी झालेली नाही. त्यामुळे असे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू शकतात.

या कारणामुळे पडताळणीस गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून विद्यापीठातर्फे एक संधी देण्यात येत आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी मुळ कागदपत्र पडताळणीसाठी शुक्रवार दि. 8 ऑक्टोबर 2021 रोजी आपल्या विभागीय केंद्रावर स.10.00 वाजता मुळ कागदपत्रासंह उपस्थित राहून पडताळणी करून घ्यावयाची आहे.

डॉ. दिनेश भोंडे
कुलसचिव तथा अध्यक्ष